**कायम विना अनुदान तत्त्वावर**
(मराठी, **इंग्रजी,** हिंदी, उर्दू , तामिळ इत्यादी माध्यम)

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/२२०६/२०१३**
**पुणे १ दिनांक:- २५/०९/२०१३**

**प्रति,**

**मुख्याध्यापिका,**
**लर्निंग ट्री इंग्लिश मिडीयम स्कूल, वराळे,**
**ता.खेड, जि.पुणे.**

**विषय:-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/**नैसर्गिक वाढीचा**/वाढीच्या प्राथम/जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. व्हीएलएस.-१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.२३ सप्टेंबर २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या **नैसर्गिक वाढीचा** /जादा तुकडया/वर्ग **सन २०१३-२०१४** या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | लर्निंग ट्री इंग्लिश मिडीयम स्कूल, वराळे, ता.खेड, जि.पुणे | इंग्रजी | इयत्ता २ री ते इयत्ता ५वी | नैसर्गिक वाढ | कायम विना अनुदान तत्वावर मंजूर |

**<u>अटी व शर्ती</u>**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**
**१) सचिव / अध्यक्ष :- खेड तालुका विद्या विकास प्रतिष्ठानचे, लर्निंग ट्री इंग्लिश मिडीयम स्कूल, वराळे, ता.खेड, जि.पुणे**
**२) मुख्याध्यापक :- लर्निंग ट्री इंग्लिश मिडीयम स्कूल, वराळे, ता.खेड, जि.पुणे**

कायम विना अनुदानित तत्वावर
(मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, तामिळ इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/१५९४/२०१७
पुणे १ दिनांक:- ५/१०/२०१७

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
खेड तालुका विद्या विकास प्रतिष्ठान, वराळे, ता. खेड संचलित
लर्निंग ट्री इंग्लिश मिडीयम स्कूल, वराळे, ता. खेड, जि. पुणे

**विषय:-कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा नैसर्गिक वाढीचा /वाढीच्या प्राथम/ जादा तुकडया /वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.**

**संदर्भ :-**१. शासन निर्णय क्र. व्हीएलएस.-१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.२३ सप्टेंबर २००३
२. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील क्र. शिउसं/प्राशि-३/नखाप्रशा/पुवि०१/ २९६००/३, दि. २.१२.२००९
३. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील क्र. शिउसं/प्राशि-३/नखाप्रशा/ मा.इंग्रजी/११-१२ /१४८८०/८३, दि. २६.७.२०११
४. या कार्यालयाचे पत्र क्र. जिप/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/२२०६/२०१३, दि. २५.९.२०१३

**उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीचा /जादा तुकडया /वर्ग सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | लर्निंग ट्री इंग्लिश मिडीयम स्कूल, वराळे, ता. खेड, जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ६ वी व इयत्ता ७ वी | नैसर्गिक वाढ | कायम विना अनुदानित तत्वावर मंजूर |

अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वंृद शासनाने वेळे ावेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकउ ामुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना
सचिव/अध्यक्ष :- खेड तालुका विद्या विकास प्रतिष्ठान, वराळे, ता. खेड, जि. पुणे

कायम विना अनुदानित तत्वावर
(मराठी,इंग्रजी, हिंदी, उर्दू , तामिळ, इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत
यशंवतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जिप/शिक्षण/प्राथ./खाप्रशा-२/३४८/२०१८
पुणे १, दिनांक - २१/२/२०१८

प्रति,

मा.शिक्षण संचालक (प्राथमिक),
महाराष्ट्र राज्य पुणे-१

विषयः- बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अनुसार प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इयत्ता ५ वी ते ८ वी चे वर्ग सुरु करणेबाबत.
खेड तालुका विदया विकास प्रतिष्ठान संचलित लर्निग टी इंग्लिश मिडियम स्कूल वराळे ता.खेड जि.पुणे या शाळेस ८ वी वर्ग सुरु करण्यास मान्यता देणेबाबत

संदर्भः-१. प्राचार्य,खेड तालुका विदया विकास प्रतिष्ठान संचलित लर्निग टी इंग्लिश मिडियम स्कूल वराळे ता.खेड जि.पुणे यांचेकडील प्रस्ताव दिनांक ३१/०१/२०१८
२.शासन निर्णय क्र.प्राशातु ११११२/२५८/२०१३)प्राशि-३मंत्रालय मुंबई ०३२ दिनांक २ जुलै २०१३

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे इयत्ता ५ वी व ८ वी चे वर्ग खालील नमुद केलेल्या कार्यपध्दतीने सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे.

१)ज्या ठिकाणी इयत्ता १ ली ते ४ थी शाळा आहे. १ कि.मी.परिसरात ५ वीचा त्याच माध्यमाचा वर्ग नाही. अशा शाळांमध्ये इयत्ता ५ वी चा वर्ग देणेत यावा.

२)ज्या ठिकाणी इयत्ता १ ली ते ७ वी पर्यत शाळा आहे व ३ कि.मी.परिसरामध्ये त्याच माध्यमाच्या ८ वी च्या वर्ग उपलब्ध आहे. अशा शाळांमध्ये इयत्ता ८ वी चा वर्ग देण्यात येऊ नये.

खेड तालुका विदया विकास प्रतिष्ठान संचलित लर्निग टी इंग्लिश मिडियम स्कूल वराळे ता.खेड जि.पुणे या शाळेस कायम विना अनुदानित तत्वावर इंग्रजी माध्यमासाठी मान्यता असून शाळेस इयत्ता १ ली ते ७ वी पर्यत वर्ग मंजूर आहेत. शाळेने ८ वी च्या वर्गाची मागणी केलेली आहे.

गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती खेड ता.खेड जि.पुणे यांनी खेड तालुका विदया विकास प्रतिष्ठान संचलित लर्निग टी इंग्लिश मिडियम स्कूल वराळे ता.खेड जि.पुणे या शाळेच्या ३ कि.मी.परिसरामध्ये इयता ८ वीच्या इंग्रजी माध्यमाचा वर्ग नाही. असे प्रमाणित केलेले आहे.

सबब सदर शाळेच्या मागणीनुसार इयत्ता ८ वी च्या वर्गास कायम विना अनुदानित तत्वावर मान्यता मिळणेस प्रस्ताव सादर करणेयत येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत :-माहितीसाठी सादर

मा.उपसंचालक, पुणे विभाग पुणे

जिल्हा परिषद, पुणे

परवानगी वर्ष :-२०१९-२०२०
माध्यम : इंग्रजी
**स्वयंअर्थ सहाय्यित शाळा**
(माध्यमिक)

जा.क.शिउसं/माध्य-३०२/प्र.मा.दर्जावाढ/पुवि/२०१९ /७७८४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - २८/१०/२०१९

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**विषय : सन २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान नविन शाळे साठी जून-२०१९ पासून इ. ९ वी व इ. १० वी इंग्रजी माध्यम चे वर्गास प्रथम मान्यता देण्याबाबत.**
**खेड तालुका विद्याविकास प्रतिष्ठाण, वराळे ता. खेड जि. पुणे संचलित लर्निंग ट्री इंग्लिश मिडीअम स्कूल, वराळे ता.खेड जि.पुणे**

**संदर्भ :-** १) शालेय शिक्षण विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्रमांक नाहप्र-२००९/(६६३/०९) माशि-१, दिनांक २०.६.२०१२
२) शालेय शिक्षण विभाग,मुंबई कडील शासान निर्णय क्रमांक एसएफएस-२०१९/प्र.क्र. ३५९/एस.एम.-२ दिनांक २७.६.२०१९
३) या कार्यालयाचे पत्र क्रं.शिउसं /माध्य-३/३०३/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१९/६३६५, दिनांक ३०.८.२०१९
४) आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र. जि.प./शिक्षणमाध्य/४६४३/२०१९, दिनांक ३०.९.२०१९

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये **खेड तालुका विद्याविकास प्रतिष्ठाण, वराळे ता. खेड जि. पुणे संचलित लर्निंग ट्री इंग्लिश मिडीअम स्कूल, वराळे ता.खेड जि.पुणे** या इंग्रजी माध्यम माध्यमिक शाळेस संदर्भीय क्र. २ चे शासन निर्णयानुसार स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून राज्यमंडळ उच्च प्राथमिकला जोडून माध्यमिक, इ. ९ वी ते १० वी इंग्रजी माध्यम दर्जावाढ करिता देण्यात आलेली होती. तदनंतर या कार्यालयाने संदर्भीय पत्र क्रमांक ३ अन्वये माध्यमिक दर्जावाढ शाळा उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक इ. ९ वी ते १० वी इंग्रजी माध्यम राज्यमंडळ करिता सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळेस परवानगी दिलेली आहे.

आता आपल्या संदर्भीय क्रमांक ४ व्दारे आपण दिलेली स्वयंस्पष्ट शिफारस विचारात **घेता खेड तालुका विद्याविकास प्रतिष्ठाण, वराळे ता. खेड जि. पुणे संचलित लर्निंग ट्री इंग्लिश मिडीअम स्कूल, वराळे ता.खेड जि.पुणे या शाळेतील उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक इ. ९ वी व इ. १० वी चे वर्गास सन २०१९-२०२० पासून इंग्रजी माध्यम राज्यमंडळ दर्जावाढ शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वाकरिता प्रथम मान्यता** देण्यात येत आहे.

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२.नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

३.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.

४.विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

५.संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

६.शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.

७.विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९.सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

१०.संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

११.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेलो परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

१२.अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०१९-२०२०** पासून असेल

१३.शैक्षणिक वर्ष **२०१९-२०२० मध्ये** ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य - अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र इंग्रजी माध्यम नवीन माध्यमिक शाळा / वर्ग असे** दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

१६.महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळा भविष्यात ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

१७.महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **U-Dise** मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१८.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी

१.शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येंवू नयेत.

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

**६. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकष,शर्ती,अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

**७. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम २००९ व नियम २०१६ चे पालन करणे बंधनकारक आहे.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तींची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

(प्रविण अहिरे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१.

23/10/18

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर**

१.मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

**१. मुख्याध्यापक, लर्निंग ट्री इंग्लिश मिडीअम स्कूल, वराळे ता.खेड जि.पुणे**

२. विभागीय सचिव,पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.

३. अध्यक्ष/सचिव, **खेड तालुका विद्याविकास प्रतिष्ठाण, वराळे ता. खेड जि. पुणे**

४. निवडनस्ती कार्यासन माध्य-३०२